**प्रेस नोट**

**दिनांक ०७/०१/२०२१**

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुददा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | श्री.कार्तीक आत्मारामजी मेश्राम, वय–५६ वर्ष, पद–कनिष्ठ लिपीक,गुगामल वन्यजीव विभाग कार्यालय, चिखलदरा. वर्ग– ३ |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | ०७.०१.२०२१ चे १४.५९ ते १५.२३ वा. दरम्यान |
| ४ | मागणी केलेली लाच रक्कम | ५०००/–रु. |
| ५ | पडताळणी दरम्यान तडजोडी अंती स्विकारण्याचे मान्य केलेली लाच रक्कम | २,५००/–रु. |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | २,५००/– रुपये |
| ६ | घटनास्थळ | शासकीय वन उद्यान, चिखलदरा समोरचे चहा चे टपरी जवळ, ता. चिखलदरा जि.अमरावती. |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार हे वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, चिखलदरा येथे वनरक्षक या पदावर कार्यरत असुन त्यांनी दि.२२/१२/२०२० रोजी दिलेल्या तक्रारी च्या अनुषंगाने पडताळणी कारवाई दरम्यान गुगामल वन्यजीव विभाग कार्यालय, चिखलदरा येथील कनिष्ठ लिपीक श्री.कार्तीक मेश्राम यांनी तक्रारदार यांना त्यांचे माहे ऑक्टोबर २०२० चे पगार काढणेबाबतचे आदेश तक्रारदार यांचे कार्यालयास पाठविण्या करीता २,५००/–रु. लाचेची मागणी पंचासमक्ष करुन स्विकारण्याचे मान्य केल्याने सापळा कारवाई आयोजित केली असता सापळा कार्यवाही दरम्यान गुगामल वन्यजीव विभाग कार्यालय, चिखलदरा येथील कनिष्ठ लिपीक श्री.कार्तीक मेश्राम यांनी तक्रारदार यांचे कडुन २,५००/– रूपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले असून गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कार्यवाही अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र अमरावतीचे मा.पोलीस अधिक्षक, श्री. विशाल गायकवाड, अप्पर पोलीस अधिक्षक श्री.अरूण सावंत, पोलीस उपअधिक्षक श्री.गजानन पडघन यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती रूपाली पोहनकर, पोलीस निरीक्षक रविन्द्र जेधे, पोकॉ. श्री.पंकज बोरसे, श्री.शैलेश कडू, श्री.राजेश कोचे तसेच चालक सपोउपनि सतिश किटुकले यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागातर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी यानी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसमाने त्यांचे कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागाशी संपर्क साधावा

संपर्क :– अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती टोल फ्री क्र. – १०६४, दुरध्वनी क्रमांक ०७२१ – २५५२३५५, २५५३०५५.

पोलीस उप-अधीक्षक कार्यालय ★ अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती ★ सत्यमेव जयते

Pohankar

(रुपाली पोहनकर)

पोलीस निरीक्षक

अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती